**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-९**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक- १ गुरूवार दिनांक ४/१०/२००७

ठराव क्रमांक - १ गुरूवार दिनांक ४/१०/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक १९/९/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक १९/९/२००७रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. साठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा.सदस्यांनी इतिवृत्ता बाबत आपल्या सुचना सांगाव्यात.

मा.श्री.जोशी अ.सु.:-सन २००७-२००८ या चालू सालचे डी.एस.आर रेट आपले कडेस आले आहेत का.?

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- होय आपले कडेस आलेले आहेत.

मा.श्री. जोशी अ.सु. :- तो आपले कडेस कधीपासून इफेक्टीव्ह धरला आहे. आपले कडेस ब-याच कामाच्या वर्क ऑर्डरी देण्याचे पेंडीग आहेत. माझ्या वॉर्डामधील दोन कामाच्या वर्क ऑर्डरी दिलेल्या नाहीत. सिमेंट कॉक्रीटची कामे मंजूर होत नाहीत. छोटी छोटी कामे सर्व ठेकेदारांना समान वाटून द्यावीत. आपले महानगरपालिकेची दरसुची मंजूर करून घेउन त्या दराने कामे करावीत अशा बाबत मी मागिल सभे मध्यें सुचना मांडली होती. त्याची इतिवृत्ता मध्ये नोंद का घेतली नाही त्याबाबत कुनाला जबाबदार घरायचे आमच्या सुचना डावलल्या जातात का ? सन २००७-२००८ सालचे डी.एस.आर. रेट आपले कडेस कधी आले ते सांगावे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- आरडे इलेक्ट्रीकल यांचे पत्रामध्ये डी.एस.आर रेट लागु झाल्याचे व सन २००७-२००८ सालचे नवीन दराने कामे द्यावीत असा उल्लेख आहे.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- आपण पीडब्ल्यु डी चे डी एस.आर रेट वापरतो. आपले कडेस तो कधी प्राप्त झाला ते पाहून सांगतो.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- एखादया कामाचे टेंडर उघडले नंतर नव्वद दिवसाचे आंत त्या वरील प्रोसिजर पूर्ण व्हावी अशी आपली पध्दत आहे. विदयुत विभागाकडील प्रस्ताव मॅकेनिकल इंजिनिअर यांच्या सहीने तयार होतात. हे कायदेशीर आहे का? कायदेशीर बाबींचा प्रश्र उद्‌भवल्यास काय करणार?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- त्याचे कडेस विभाग प्रमुख म्हणून चार्ज आहे.

मा.श्री. जोशी अ.सु :- ठेकेदारांना कामे परवडत नाहीत. दिड दोन वर्षापासून कामे होत नाहीत रेट ॲनालीसीस पूर्ण केलेले नाही. सिमेंट दर वाढले, कामाचा निधी परत गेला तर त्यास कोण जबाबदार कामासाठी रोज मेमो द्यावा का? आमची कामे होणार कधी.

मा.श्री.त्रिपाठी सु.चं.:-म.न.पा. बजेट चे पंचवीस टक्के रक्कम बांधकाम विभागाकडील कामांवर खर्च करते. त्या विभागाकडेस कर्मचारी भरपुर आहेत. तरी ही कामे होत नाहीत.म.न.पा.नेच कामे करावतीत.

मा.श्री.जोशी अ.सु.:-मागिल सभेमध्ये मी मा.आयुक्त साहेबांनी म.न.पासाठी दर सुची मंजूर करावी व त्या दराने कामे करून घ्यावीत अशी सुचना केली होती ते इतिवृत्तामध्ये का घेतले नाही त्यास जबाबदार कोण?

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब:-आपण मांडलेली डी.एस.आर दराबाबतची सुचना इतिवृत्ताचे पान सहावर नोंदविलेली असून सर्वच चर्चा शब्दशः घेतलेली नसून आपले म्हणण्याचा मतीतार्थ त्यामध्ये स्पष्टपणे आढळतो.

मा.श्री. जोशी अ.सु. :- सुचना अंमलात याव्यात. ठेकेदार वर्क ऑर्डर मिळूनही कामे सुरू करीत नाहीत. काम सुरू का केले नाही अशा बाबत नोटीसा काढणे, त्यांना दिलेली कामे रद्द करणे बाबत तीन महिन्यापूर्वी सुचना केल्या असतांनाही त्या पाळल्या जात नाहीत.अजूनही कार्यवाही होत नाही.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आपली नेमकी कोण कोणती कामे झालेली नाहीत ते सांगावे.

मा.श्री. जोशी अ.सु :- प्रेमदान हडको आणि म्हाडा वसाहत येथील दोन कामे आहेत. त्याचे टेंडर मंजूर झालेले आहे.कामे त्वरीत पूर्ण करावीत.

मा.सभापती साहेब :- श्री. जोशी साहेबांचे वॉर्डातील कामे चार दिवसात मार्गी लावावीत.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- कामे लवकरात लवकर मार्गी लावतो.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा.जोशी साहेबांचे वॉर्डातील कामे लवकारात लवकर पूर्ण करून घ्यावीत.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- मागिल सभा दिनांक १९/९/२००७ चे विषय पत्रिके वरील विषय क्रमांक चार चे प्रकरणी फेर निविदा मागविण्यांस मी विरोधी केला होता.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आपण विरोध केला होता. तसेच श्री. जोशी साहेबांनी सदर प्रकरणी फेर निविदा मागवाव्यात असे मत व्यक्त केले होते. त्याप्रमाणे इतिवृत्तामध्ये नोंद आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- मिस्कीन मळा बागेचे निविदा प्रकरणी ठरावाप्रमाणे जाहिर निविदा मागविल्यास सहा महिन्याचा कालावधी जाईल. कामाचा खर्च ही वाढेल. मग बागेचे काम पूर्ण होणार कधी.

मा.सभापती साहेब :- प्रशासनाने आपले मत द्यावे.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :-आरडे इले.यांनी यावेळी ४०%जादाचे दर दिल्याने त्यांना निगोशिएशनसाठी बोलाउ शकत नाही.कमीचे निविदा धारकास बोलावतो. कामास विलंब झाल्यास खर्च वाढतो. कमीचे निविदा धारक श्री.आरडे इले.यांनी पूर्वी कमीचे दरात काम करणेस तयार असलेबाबत लेखी देण्यास इन्कार केल्या मुळे फेर निविदा मागविल्या आहेत. या कामाचे आलेले कार्यालयाने स्विकारलेले २३.५० % जादाचे दर करंट डी.एस.आर रेट प्रमाणे९.४७%जादाचे येतात ते मान्य करणे योग्य आहे असे मत दिलेले असून शहर अभियंता यांनी ही आलेले निविदाधारक श्री.ए.सी.शेख यांचे कमीचे दर हे २३.५०%जादा दराचे असले तरी करंट डी.एस.आर रेटशी तुलणा करता ते ९.४७%जादाचे येतात ते स्विकारणे योग्य होईल.परत फेरनिविदा कामी नविन एस्टीमेट करावे लागेल ते जादा रकमेचे होईल. असे मत दिलेले आहे. त्याची मा.स्थायी समिती सभा दिनांक१९/९/२००७चे इतिवृत्ताचे पान.नं.९ वर नोंद आहे

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- सर्व सदस्यांनी मान्यता दिल्यास मिस्कीन मळा बागेचे कामाची वर्क ऑर्डर देउन सहा महिन्यात बागेचे काम पूर्ण होउ शकेल. सहा महिन्यात उदयान म.न.पा.चे ताब्यात घेता येईल. फेर निविदा मागविल्यास कामाचा खर्च वाढेल शहर अभियंता यांनी आपले मत मांडावे.

शहर अभियंता श्री.पालवे व्ही.डी. :- फेर निविदा काढल्यास पुढे काय होईल ते सांगता येणार नाही. आलेले दर सन २००७-२००८ चे डी. एस आर रेट नुसार ९.४७% जास्तीचे येतात ते वाजवी वाटतात.फेर निविदा काढणेची रिस्क घेतली तर पुढे काय होईल हे सांगता येणार नाही.

मा.सभापती साहेब :- हया प्रकरणी टेंडर प्रोसिजर पूर्ण करण्यांस किती वेळ लागेल.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- महिना लागेल, जादा वेळ सुध्दा जाईल.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.व मा.श्री. तिवारी सु.र. :- आलेले कमीचे दर मंजूर करावे.फेर निविदा काढल्यास वेळ जाईल. खर्च ही वाढेल.

मा.श्री. बोरूडे अ.व. व मा.श्री. घुले अ.ह.:- फेर निविदा काढू नयेत. मा.आयुक्त साहेबांनी निविदा मंजूरीचा चा निर्णय घ्यावा.

मा.श्री. तिवारी सु.र. :- वाढीव खर्च मंजूरी साठी प्रस्ताव स्थायी समिती पुढे येउ देउ नये.

मा.श्री.त्रिपाठी सु.चं.:-या प्रकरणी कामांच्या काही उणिवा स्केटीग ट्रॅक इत्यादीच्या आहेत त्या पूर्ण कराव्यात कामे अंतर्भूत करावी.बागेची श्री. ए.सी.शेख यांची आलेली कमी दराचा निविदा मंजूर करावी.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- नकाशा प्रमाणे कामे होतील.

मा.सभापती साहेब :- स्थायी समिती सभा दिनांक १९/१०/२००७ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करणे विषयी सभे मध्ये झालेल्या साधक बाधक चर्चे नुसार मा.स्थायी समिती सभा दिनांक १९/१०/२००७ ठराव क्रमांक चार मध्ये सावेडी येथे बगीचा विकसीत करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणे विषयी प्रशासनाने सदर केलेल्या ऑफीस रिपोर्टावर "सदर कामाचे चालू जिल्हा दर सुची नुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार करून सात दिवसाची शॉर्ट मुदतीची जाहिर नोटीस देउन जाहिर निविदा दर मागविणेस मंजूरी देण्यांत येत आहे. नियमानुसार पुढील कार्य वाही करावी " या प्रमाणे मागील सभे मध्ये ठरविण्यांत आलेले आहे परंतु प्रशासनाने आलेले कमीचे दर मान्य करून स्विकारणे विषयी शिफारस केलेली असल्याने व मा.सदस्यांनीही तसे मत व्यक्त केलेले असल्याने सदर प्रकरणी मा.आयुक्त साहेब,अहमदनगर महानगरपालिका यांनी निविदा मंजूरी विषयी पुढील योग्य तो निर्णय घेउन नियमानुसार पुढील कार्यवाही करावी. मा.स्थायी समिती सभा सभा दिनांक १९/१०/२००७ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे.

**ठराव** :- मा.स्थायी समिती सभा दिनांक १९/१०/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे विषयी सभे मध्ये झालेल्या साधक बाधक चर्चे नुसार पुढील प्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यांत येत आहे.

स्थायी समिती सभा दिनांक १९/१०/२००७ ठराव क्रमांक चार एकात्मीक शहर विकास योजने अंतर्गत नगररचना योजना क्रमांक-४ अं.भू.क्र. २६२ मिस्कीन मळा सावेडी येथे बगीचा विकसीत करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दरास मंजूरी मिळणे विषयी प्रशासनाने सादर केलेल्या ऑफीस रिपोर्टावर "सदर कामाचे चालू दरसुची नुसार, सुधारीत अंदाजपत्रक तयार करून, सात दिवसाची शॉर्ट मुदतीची जाहिर नोटीस देउन, जाहिर निविदा दर मागविणेस मंजूरी देण्यात येत आहे" या प्रमाणे मागील सभे मध्ये ठरविण्यांत आलेले आहे परंतु प्रशासनाने आलेले कमीचे दर मान्य करून स्विकारणे विषयी शिफारस केलेली असल्याने व मा.सदस्यांनीही तसे मत व्यक्त केलेले असल्याने सदर प्रकरणी मा.आयुक्त साहेब,अहमदनगर महानगरपालिका यांनी निविदा मंजूरी विषयी पुढील योग्य तो निर्णय घेउन नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

मा.स्थायी समिती सभा दिनांक १९/१०/२००७ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा .श्री. बोरूडे अ.व.

अनुमोदक :-मा. श्री. घुले.अ.ह.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-९**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक- २ गुरूवार दिनांक ४/१०/२००७

ठराव क्रमांक - २ गुरूवार दिनांक ४/१०/२००७

**प्रस्तावाचा विषय:-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.१२ मधील जुन्या पिंपळगाव रोड वरील कोहिनूर मंगल कार्यालय ते पारिजात कॉर्नर ते तिरूमला बंगल्या जवळील नाल्या दरम्यान ८०० एम.एम. व्यासाची गटर करणे कामी मागविण्यांत आलेल्या व स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक श्री. पंकज जहागिरदार, अहमदनगर यांचे निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**विषय-प्र.क्र.१२मधील जुना पिंपळगांव रोडवरील कोहिनूर मंगल कार्यालय ते पारिजात कॉर्नर ते तिरूमला बंगल्याजवळील नाल्यादरम्यान८००एम.एम.व्यासाची गटर करणे.

(अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,९८,३३४/-)

विषयांकीत काम रक्कम रू. १४,९८,३३४/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा ठ.क्र. ३ दिनांक ४/५/२००७ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळाली आहे.

त्याअनुषंगाने दिनांक २९/५/२००७ रोजी दैनिक गांवकरी या वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्यात येउन को-या निविदा फॅार्मची विक्री दिनांक ३१/५/०७ ते दिनांक १४/६/०७ अखेर करण्यात येउन सिलबंद निविदा दिनांक १६/६/०७ रोजी स्विकारण्यात आल्या. सदर कामाच्या एकुण ५ निविदा प्राप्त झाल्या होत्या व त्या मा. उपायुक्त यांचे दालनात दिनांक २२/६/०७ रोजी उघडण्यात आल्या असता त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं. | निविदा धारकांचे नांव | भरलेले दर % |
|---|---|---|
| १. | श्री. पंकज जहागिरदार | ३ %कमी |
| २. | श्री. अभिजीत जोशी | ३ % जास्त |
| ३. | श्री. विकास जगताप | १.२१ % कमी |
| ४. | श्री. शिवाजी बढे | १८.१८ % जास्त |
| ५. | श्री. विजय म्हस्के | १.६ % कमी |

उपरोक्त ५ निविदापौकी ठेकेदार श्री. पंकज जहागिरदार यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३ % कमी असल्याने ठेकेदारास दि.३/७/२००७ रोजीच्या छाननी समितीमध्ये संबंधीत ठेकेदारास काम देणेचे मंजूर झालेले असुन मा.आयुक्त साहेब यांनी दि.६/८/०७ रोजी मान्यता दिलेली आहे.

१] विषययांकित कामाचे अंदाजपत्रक सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुचीवर आधारीत आहे.

२] सार्व.बांधकाम विभाग,अ.नगर यांनी सन २००६-०७ या वर्षाकरिता जिल्हा दरसुची प्रसिध्द केले असुन त्यानुसार दर लागु करण्यात आले आहे.

३] निविदेमध्ये Star Rates अथवा Escalation ची तरतूद नाही व ठेकेदारास कोणत्याही प्रकारे Star Rates अथवा Escalation ची रक्कम अदा केली जाणार नाही.

४] अंदाजपत्रकात ठेकेदारास ४ % व्हॅट टॅक्सचा समावेश नाही.

सबब विषयाकिंत कामी श्री. पंकज जहागिरदार यांची सर्वात कमी दराची म्हणजे ३% कमी दराची होणारी निविदा मा.स्थायी समिती पुढे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) नुसार संविदा मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे. तरी कृपया सदरचा विषय मा.स्थायी समितीच्या सभेत अंतर्भुत करणेस सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय:-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.१२ मधील जुन्या पिंपळगाव रोड वरील कोहिनूर मंगल कार्यालय ते पारिजात कॉर्नर ते तिरूमला बंगल्या जवळील नाल्या दरम्यान ८०० एम.एम. व्यासाची गटर करणे कामी मागविण्यांत आलेल्या व स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक श्री. पंकज जहागिरदार, अहमदनगर यांचे निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र. :- ऑफीस प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सौ.पवार सं.बा. :- हा प्रस्ताव प्रभाग क्रमांक दोन मधील असून प्रभाग क्रमांक १२ हा चुकीचा आहे.वॉर्ड क्रमांकाची गल्लत होते. अशा चुका या पुढे होउ नयेत.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- हया कामाचे ठेकेदाराने तीन टक्के कमीचे दर दिलेले आहेत काम त्यांना परवडत आहे.म्हणूनच कमीचे दर दिलेले आहेत. परंतु सदरची ८०० मी.मी. पाईप गटर करणे ऐवजी ती १२००मी.मी. पाईप गटर करण्यांत यावी.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- त्यामुळे एस्टीमेट वाढते.एस्टीमेट प्रमाणे काम होईल.

मा.श्री. बोरूडे अ.व :- आलेले कमीचे दर मंजूर करण्यांत यावे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते आलेले कमीचे दर मंजूर करावे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील जुन्या पिंपळगाव रोड वरील कोहिनूर मंगल कार्यालय ते पारिजात कॉर्नर ते तिरूमला बंगल्या जवळील नाल्या दरम्यान ८०० एम.एम. व्यासाची गटर करणे कामी मागविण्यांत आलेल्या स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक श्री. पंकज जहागिरदार अहमदनगर यांचे अंदाज पत्रकीय दरापेक्षा ३%(तीन टक्के) कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
मा.स्थायी समिती सभा क्रमांक-९
सन २००७-२००८.

विषय क्रमांक- ३ गुरूवार दिनांक ४/१०/२००७

ठराव क्रमांक - ३ गुरूवार दिनांक ४/१०/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नागरी दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रभाग क्र.५ एस.टी.स्टॅन्ड ते माळीवाडा वेशी पर्यत रस्ता डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दर धारक श्री. राजेंद्र जाधव यांचे निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-कामाचे नांव-नागरी दलीत वस्ती- सन २००६-०७ प्र.क्र.-५ मधे एस.टी.स्टॅन्ड ते माळीवाडा वेस पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे.

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. ४७,३२,०००=००
२] तांत्रिक मान्यता रक्कम रू. ४७,३२,०००=००
३] तांत्रिक मान्यतेची दरसुची २००६-२००७
४] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम रू ४५,२३,८३४=००
५] निविदा प्रसिध्दी तारीख ६/४/०७
६] निविदा विक्री कालावधी ७/४ /२००७ ते २१/४ /२००७ (१५ दिवस)
७] निविदा स्विकारण्याची तारीख २१/४ /२००७
८] निविदा उघडण्याची तारीख ३/५/२००७
९] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील
१०] कामाची मुदत कार्यादेश दिल्यापासून ४ महिने

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १. | श्री. राजेंद्र जाधव | १५ % |
| २. | श्री. फ्युचुरा लिमीटेड | २६ % |
| ३. | श्री. अनिल कोठारी | २५ % |

वरील तुलणात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे. श्री. राजेंद्र जाधव यांचा देकार सर्वात कमी म्हणजे १५ % जादा आहे.सदर प्रस्ताव छाननी समिती समोर दिनांक ५/५/२००७ च्या चर्चेला आला. तेव्हा सदर काम २००६-०७ दरसुची पेक्षा ५ % जादा दराने करावे असे समितीने शिफारस केली आहे.

त्या अनुषंगाने श्री. राजेंद्र जाधव, यांचा सुधारीत देकार १०% जादा (मुळ अंदाजपत्रकापेक्षा) पत्र क्र. ५/५/०७ अन्वये प्राप्त झाला आहे. सुधारीत देकारानुसार सद्यास्थिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १० | सुधारीत देकारानुसार होणारी कामाची किंमत | रू. ४९,७६,२१७/- |
| ११ | चालू दरसुची सन ०७-०८ अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. ६१,५१,०६१/- |
| १२ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू. ११,७४,८४४/- |
| १३ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी $\left(\frac{१२}{११} \times १००\right)$ | १९.१०% |
| १४. | शेरा / अभिप्राय | खालीलप्रमाणे |

सदर कामाची निविदा दि. ३/५/०७ रोजी उघडण्यात आली असून ठेकेदाराची मुदत निविदा शर्तीनुसार निविदा उघडल्यापासून ९० दिवस आहे. तथापी या कालावधीमध्ये निर्णय झाला नाही, यास्तव ठेकेदाराने दि.२१/६/०७ अन्वये त्यांच्या देकाराची मुदत वाढवून दिली आहे. तसेच सध्या सन ०७/०८ ची दरसुची अंमलात आली आहे. त्यानुसार चालू दरसुचीवर किंमत रू.६१,५१,०६१/- इतके येत आहे. मुळ निविदा रकमेत (परिशिष्ठ ब- बाब क्र.१४) रकमेत रू.४,८२,५०१/-इतका फरक आढळून आली आहे. त्यामुळे चालू दरसुचीप्रमाणे किंमत जास्त दिसते.

निविदा स्विकृतीचा मुळ ९० दिवसाचा कालावधी होवून गेल्याने आता निविदा स्विकृती तातडीने होणे आवश्यक आहे. सदर निविदा चालू दरसुची तुलनेत १९.१० % कमी दराची असल्याने स्विकृतीसाठी व स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सदर कामाचे कमीचे निविदा दर धारक श्री. राजेंद्र जाधव यांनी "आम्ही काम करण्यांस तयार होतो. पण नव्वद दिवसात त्या बाबत निर्णय झाला नाही. सन २००७-०८ च्या नवीन दराप्रमाणे एस्टीमेट करून त्यांचे पेक्षा दहा टक्के जादाचे दर वाढवून दिल्यास आम्ही ते काम करण्यांस तयार आहोत" अशा बाबत दिनांक ३/१०/२००७ रोजी माझे कडेस पत्र दिलेले आहे ते वाचून दाखवावे.

त्या प्रमाणे मा.सभापती साहेब यांना श्री. राजेंद्र जाधव यांनी दिनांक ३/१०/२००७ रोजी दिलेले पत्र सभे मध्ये वाचून दाखविले.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- या प्रकरणामध्ये ठेकेदाराने इन्कमटॅक्स सार्टीफिकेट दिलेले नाही.

मा.श्री. जोशी अ.सु. :- कामाची वर्क ऑर्डर ठेकेदारास दिल्यानंतर ठेकेदाराने काम सुरू केले नाही तर ठेकेदाराचे डिपॉझीट जप्त करता येईल का ?

मुख्य लेखा परिक्षक श्री. कदम के.ए. :- प्रोसेस पुर्ण झाले नंतर असे दिलेले पत्र नाकारणे योग्य वर्क ऑर्डर दिल्या नंतर डिपॉझिट जप्त करणेचा प्रश्न येत नाही.

मा.श्री. जोशी अ.सु. व मा.श्री. घुले अ.ह. :- असे प्रतेंक ठेकेदार करील, वर्क ऑर्डर घेईल, भाववाढ झाली म्हणून निविदा रक्कम वाढवून द्यावी म्हणले.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आपण निविदादर मंजूर केले ठेकेदारास कामाची वर्क ऑर्डर दिली त्यानंतर ठेकेदाराने काम करण्यांस नकार दिल्यास ठेकेदारावर कारवाई करणेचे आपण म्हणू शकतो.

मा.श्री.जोशी अ.सु.:- या प्रकरणी निगोशिएशन केले काम करण्यांस तयार आहे असे पत्र दिलेले आहे का?

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- पत्र दिले आहे.

मा.श्री.त्रिपाठी सु.चं. :- आता सदर ठेकेदार "टेंडर प्रोसिजर होउन नव्वद दिवस उलटले आहेत भाव वाढले सन २००७-२००८ चे रेट पेक्षा दहा टक्के जादा दर द्यावे" असे म्हणतात.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- काम करण्यांस तयार असले बाबत त्यांनी पत्र दिलेले आहे.

मा.श्री.त्रिपाठी सु.चं.:- सदर ठेकेदार यांनी दिनांक २१/६/२००७ रोजी शहर अभियंता यांना "दिनांक ३/५/०७ रोजी निविदा उघडले नंतर कामाबाबत चर्चा झाल्यानंतर आम्ही वरील काम दहा टक्के जादा दराने करण्यांस तयार आहे अशा आशयाचे पत्र देउन बरेच दिवस झाले निर्णय झाला नाही.मुळ अंदाज पत्रकात असलेले दर व बाजारातील प्रचलीत दरात मोठया प्रमाणात दरवाढ झाली आहे. वरील दरवाढ व सन २००७-२००८ या वर्षी आलेले नवीन अंदाजपत्रक यातील तफावत लक्षात घेता मुदत संपण्यापूर्वी निर्णय देण्यात यावा.आवश्कता असल्यास आम्ही देकाराची मुदत वाढवून देण्यांस तयार आहोत" अशा बाबत पत्र दिलेले आहे. त्यानंतर चार महिन्याचा कालावधी गेलेला आहे. त्यांचे पत्रास उत्तर दिलेले नाही.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- सदरचे निविदा प्रकरण छाननी समिती पुढे गेल्या नंतर पांच टक्के जादा दराने काम करणे बाबत ठरले.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- त्यांचे पत्रास लेखी उत्तर दिलेले नाही ते मे. कोर्टात गेल्यास काय ? आपले कामाची पध्दत बदलावी.

मा.सभापती साहेब :- या प्रकरणी फेर निविदा मागवाव्यात का ?

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- प्रकरणांस उशिर झालेला आहे. मी रूजू झालो तेव्हा हया फाईली पेंडीग होत्या त्या पाहून पुढे मार्गी लावल्या आहेत. फेर निविदा बाबत मा.सभेने निर्णय घ्यावा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- दप्तर दिरंगाई बध्दल संबंधीतावर कारवाई करावी.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- या प्रकरणातील कार्यालयीन प्रस्तावावर शहर अभियंता व उपायुक्त साहेब यांच्या वेगवेगळया महिन्यातील सहया आहेत.

मा.सभापती साहेब :- निविदांचा तुलणात्मक तक्ता छाननी समिती पुढे जात असल्याने तो स्थायी समिती पुढे येण्यास विलंब होतो.दरम्यान भाववाढ होते, खर्च वाढतो, वेळ जातो.विलंबामुळे जादा दराची निविदा मंजूर करावी लागते. प्रशासन तत्परतेने काम करीत नाही त्यामुळे एक निविदा नामंजूर केली. त्याकरिता आपले म.न.पा.चे कामांच्या जाहिर निविदा मागवितांना निविदा स्विकृतीची अंतीम वेळ व तारीख, तसेच निविदा उघडणेचा व त्यावरील पुढील प्रोसिजन पूर्ण करणे बाबतची मुदत आपले सभेने ठराव करून ठरवावी तसेच छाननी समिती बाबत ठरवावे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.:-एस्टीमेट शहर अभियंता करणार, छाननी समिती मध्ये ही तेच असणार यांचे असे काम कसे.ती बरखास्त करावी. तत्परतेने कामे होत नाहीत. छाननी समिती नियमानुसार नाही,रद्द करावी.

मुख्य लेखा परिक्षक श्री. कदम के.ए. :- छाननी समिती रद्द करावी किंवा कसे बाबत सभेने निर्णय घ्यावा.

मा.श्री.त्रिपाठी सु.चं.,मा.श्री.जोशी अ.सु.व मा.श्री.तिवारी सु.र.:- या प्रकरणी फेर निविदा मागवाव्यात छाननी समिती रद्द करावी.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- रक्कम रूपये दहा लाखाचे वरील रकमे च्या निविदा सबमिशनच्या अंतीम दिवशीचे वेळे नंतर अगर लगतचे दिवशी निविदा उघडणेची वेळ निश्चित करून निविदा जाहिरातीत अशी सुचना मांडावी.

लेखाधिकारी श्री. कर्डील पी.बी. :- होय हे नियमानुसार आहे.

मुख्य लेखा परिक्षक श्री. कदम के.ए. :- टेंडर उघडणेची तारीख, वेळ टेंडरचे जाहिरातीत असावी.

मा.उपायुक्त श्री. जावळे साहेब :- टेंडर उघडल्यानंतर त्या वरील सर्व प्रोसिजर पूर्ण होउन त्या वेळचे वेळी मा.स्थायी समिती पुढे निर्णयासाठी यावयास हवे निविदा उघडले नंतर प्रोसिजर पूर्ण होउन मा.स्थायी समिती कडे प्रकरण पाठविण्यांस किती मुदत असावी.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- तीस दिवसात प्रोसिजर पूर्ण होउन प्रकरण मा.स्थायी समिती पुढे यावयास हवे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- या प्रकरणी नव्वद दिवसात निर्णय झाला नाही डी.एस.आर रेट वाढलेले आहेत जादा रकमेचे काम कमी रक्कमेत करण्यास कोण तयार होणार? प्रकरण कालावधी संपल्या नंतर स्थायी समिती पुढे आलेले आहे. माझ्या मते या कामी फेर निविदा मागवाव्यात चर्चा करून सभेने त्वरीत निर्णय घ्यावा फेर निविदा दराचे प्रकरण तीस दिवसात छाननी समिती कडे न पाठविता स्थायी समिती पुढे निर्णयासाठी पाठवावे.

मा.सभापती साहेब :- या प्रकरणी फेर निविदा चे प्रोसिजर साठी किती वेळ लागेल.हे शहर अभियंता यांनी सांगावे.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही .डी :- प्रोसिजर साठी एक महिना तरी जातो.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- तीस दिवसात प्रकरण स्थायी समिती सभे पुढे यावे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- टेंडर बी वन मध्ये डिफेक्टीव्ह लायबलीटी चा क्लॉज असतो. अप्पू चौक ते अमरधाम रस्त्याचे कार्पेटींगचे चाळीस पन्नास लाखाचे काम मध्यतंरी म.न.पा.ने केलेले आहे. ते रस्ते खराब झालेले आहेत.डिफेक्टीव्ह लायबेलीटीचे क्लॉज चे काय ? पुढील मिटींग मध्ये शहर अभियंता यांनी माहिती द्यावी.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- टेंडर पाहून सांगतो.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- सदर कामी फेर निविदा मागविण्यांत याव्यात.छाननी समिती रद्द करावी.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- फेर निविदा मागविण्यांत याव्यात.

मा.सभापती साहेब :- सदर प्रकरणी सर्वानुमते फेर निविदा मागविण्यांत याव्यात. तसेच म.न.पा.चे कामा विषयी मागविण्यांत येणा-या निविदावर प्रशासाने आवश्यक ती सर्व कारवाई पूर्ण करून तीस दिवसाचे आंत मा.स्थायी समिती सभे पुढे निविदांचा तुलणात्मक तक्ता सादर करण्यांत यावा.निविदांचे जाहिर नोटीसी मध्ये निविदा उघडणेची वेळ व दिनांक याचा उल्लेख असावा. म.न.पा.ची छाननी समिती रद्द करण्यांत यावी.

**ठराव** :-अहमदनगर महानगरपालिकेचे नागरी दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रभाग क्र.५ एस.टी.स्टॅन्ड ते माळीवाडा वेशी पर्यत रस्ता डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दर धारक श्री. राजेंद्र जाधव यांचे निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चे नुसार पुढील प्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यांत येत आहे.

सदर कामाचे जाहिर फेर निविदा दर मागविण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

तसेच म.न.पा.चे कामा विषयी मागविण्यांत येणा-या निविदावर प्रशासाने आवश्यक ती सर्व कारवाई पूर्ण करून तीस दिवसाचे आंत मा.स्थायी समिती सभे पुढे निविदांचा तुलणात्मक तक्ता सादर करण्यांत यावा.निविदांचे जाहिर नोटीसी मध्ये निविदा उघडणेची वेळ व दिनांक याचा उल्लेख असावा. म.न.पा. ची छाननी समिती रद्द करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.

अनुमोक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-९**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक- ४ गुरूवार दिनांक ४/१०/२००७

ठराव क्रमांक - ४ गुरूवार दिनांक ४/१०/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्यीतील अनुसुचित जातीसाठी राखीव असलेल्या प्रभाग क्र.१० मधील नालेगांव हाडको पुला पर्यत रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा धारक श्री. राजेंद्र जाधव यांचे निविदा दरास मंजुरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय- निविदा मंजुरी बाबत.

**कामाचे नांव-** अ.नगर म.न.पा हद्यीतील प्र.क्र. १० अनुसुचित जातीसाठी राखीव राखीव प्रभाग नालेगांव हडको पुलापर्यत रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करणे.

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता :- महासभा ठराव क्र.१ दिनांक २८/२/०७ अन्वये कामास मंजूरी.

२] मा.जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र क्र. सुजयो / वशी/ २३३/०७ दिनांक २६/३/०७ अन्वये दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त.

३] प्रशासकीय मान्यता रक्कम :- रू. २०,००,०००/-

४] तांत्रिक मान्यता रक्कम :- रू. १९,९८,९७०/-

५] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- २००६-२००७

६] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम :- रू. १९,५१,४८०/-

७] निविदा प्रसिध्दी तारीख :- ६/०४/२००७

८] निविदा विक्री कालावधी :- ७/४/०७ ते २१/४/०७ (पंधरा दिवस)

९] निविदा स्विकारण्याची तारीख २४/४ /०७

१०] निविदा उघडण्याची तारीख ३/५/०७

११] कामाची मुदत :- ६ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १. | श्री. राजेंद्र जाधव | ९.९९ % जादा |
| २. | श्री. फ्युचुरा लिमीटेड | १५.५५ % जादा. |
| ३. | श्री. अनिल कोठारी | १७.५५ % जादा. |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने श्री. राजेंद्र जाधव यांचा देकार सर्वात कमी म्हणजे ९.९९ % जादा आहे. सदर प्रस्ताव छाननी समिती समोर दिनांक १९/६/२००७ च्या चर्चेला आला.तेव्हा सदर काम २००६-०७ दरसुची दराने करावे असे समितीने शिफारस केली त्या अनुशंगाने श्री. राजेंद्र जाधव त्यांचा सुधारीत देकारा दिलेला नाही. सुधारीत देकारानुसार सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १० | सुधारीत देकारानुसार होणारी कामाची किंमत | रू. २१,४६,४३३/- |
| ११. | चालु दरसुची सन- ०७-०८ अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. १९,९३,९८०/- |
| १२. | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू. १,५२,४५३/- |
| १३. | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (१२ x १००) / ११ | ७.६५ % जादा. |
| १४. | शेरा / अभिप्राय | खालीलप्रमाणे |

सदर कामाची निविदा दिनांक ३/५/०७ रोजी उघडण्यात आली असुन ठेकेदाराची मुदत निविदा शर्ती नुसार निविदा उघडल्यापासून ९० दिवस आहे. तथापी या कालावधीमध्ये निर्णय झाली नाही. यास्तव ठेकेदाराने दिनांक २७/७/०७ अन्वये त्यांच्या दोकराची मुदत वाढून दिली आहे. तसेच सध्या सन ०७-०८ ची दरसुची अंमलात आली आहे त्यानुसार दरसुचीशी तुलना करता ठेकेदाराचा देकार ७.६५ % जादा येत आहे.

निविदा स्विकृतीचा मुळ ९० दिवसाचा कालावधी होवुन गेल्याने आता निविदा स्विकृती तातडीने होणे आवश्यक आहे. तसेच या रस्त्याच्या कडेने गटर अस्तित्वात आहे. तसेच या रस्त्याच्या बाजुने मोठया आकाराची बंद पाईप गटर मंजूर असुन निविदा निश्चिती प्रगतीत आहे. बांधकाम साहित्याचे दरात वाढ झाल्याने ठेकेदाराने त्यांचा देकार कमी करण्यास नकार दिलेला आहे. असे त्यांच्या दि. २७/७/२००७ चे पत्रान्वये दिसत आहे.

सदर निविदा चालू दरसुची तुलनेत ७.६५ % जादा दराची असल्याने स्विकृतीसाठी व मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- आलेले कमीचे दर मंजूर करण्यांत यावे.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्टा नुसार आलेले कमीचे दर सर्वानुमते मंजूर करण्यांत यावे.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील अनुसुचित जातीसाठी राखीव असलेल्या प्रभाग क्र. १० मधील नालेगांव हाडको पुला पर्यत रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दर धारक श्री. राजेंद्र जाधव यांचे निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत कार्यालयाने सादर केलेला ऑफीस रिपोर्ट पहाता कमीचे निविदा दर धारक श्री. राजेंद्र जाधव अहमदनगर यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९%(नउ पुर्णाक नव्याण्णव शतांश टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.

अनुमोक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-९**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक- ५ गुरूवार दिनांक ४/१०/२००७

ठराव क्रमांक - ५ गुरूवार दिनांक ४/१०/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नागरी दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत वॉर्ड क्र.४ व १४ मधील अमर हॉटेल ते रामवाडी चौकापर्यत रस्ता डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा धारक श्री. अनिल झेड कोठारी, अ.नगर यांचे निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय, निविदा मंजुरी बाबत.

**कामाचे नांव :-** दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र. १४ व ४ मध्ये अमर हॉटेल ते रामवाडी चौका पर्यत रस्ता डांबरीकरण करणे.

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता :- महासभा ठराव क्र.१ दिनांक २८/२/०७ अन्वये कामास मंजूरी.

२] मा.जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र क्र. सुजयो / वशी/ २३३/०७ दिनांक २६/३/०७ अन्वये दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त.

३] प्रशासकीय मान्यता रक्कम :- रू. ८०,००,०००/-

४] तांत्रिक मान्यता रक्कम :- रू. ८०,००,०००/-

५] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- २००६-२००७

६] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम :- रू. ७८,१८,८०२/-

७] निविदा प्रसिध्दी तारीख :- ७/०४/०७ ते २१/४/०७

८] निविदा विक्री कालावधी :- (पंधरा दिवस)

९] निविदा स्विकारण्याची तारीख २४/४ /०७

१०] निविदा उघडण्याची तारीख ३/५/०७

११] कामाची मुदत :- ६ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १. | मे.ए.सी.कोठारी | १०.०१ % जादा. |
| २. | श्री. अनिल झेड कोठारी | ९.९९ % जादा. |
| ३. | मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन | ११.९९ % जादा. |

वरील तुलणात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे. अनिल झेड कोठारी यांचा देकार सर्वात कमी म्हणजे ९.९९ %जादा आहे. सदर प्रस्ताव छाननी समिती समोर दिनांक ३१/५/२००७ च्या चर्चेला आला. तेव्हा अनिल झेड कोठारी यांच्या समवेत दर कमी करण्यासाठी वाटाघाटी केल्या असता त्यांनी सुधारीत देकार ४.९९ % जादा (मुळ अंदाजपत्रकापेक्षा) इतका त्यांचे पत्र क्र. ३१/५/०७ प्राप्त झाला आहे.

सुधारीत देकारानुसार सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १० | सुधारीत देकारानुसार होणारी कामाची किंमत | रू.८२,०८,९६०/- |
| ११. | चालु दरसुची सन- ०७-०८ अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू.८२,२०,१७२/- |
| १२. | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू. ११,२१२/- |
| १३. | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी<br>(१२ x १००)<br>११ | ०.१३६ % कमी |
| १४. | शेरा / अभिप्राय | खालीलप्रमाणे |

सदर कामाची निविदा दिनांक ३/५/०७ रोजी उघडण्यात आली असुन ठेकेदाराची मुदत निविदा शर्तीनुसार निविदा उघडल्यापासून ९० दिवस आहे. तथापी या कालावधीमध्ये निर्णय झाला नाही. यास्तव ठेकेदाराने दिनांक २२/६/०७ अन्वये त्यांच्या देकाराची मुदत वाढुन दिली आहे. तसेच सध्या सन-०७-०८ ची दरसुची अंमलात आली आहे. त्यानुसार दरसुचीशी तुलना करता ठेकेदाराचा देकार ०.१३६ % कमी येत आहे.

निविदा स्विकृतीचा मुळ ९० दिवसाचा कालावधी होवुन गेल्याने आता निविदा स्विकृती तातडीने होणे आवश्यक आहे. तसेच वाटाघाटीमध्ये ठेकेदाराने दिलेला सुधारीत देकार ४.९९% जादा हा सर्वसाधारण भाववाढीची सुसंगत आहे.

सदर निविदा चालू दरसुची तुलनेत कमी दराची असल्याने स्विकृतीसाठी व मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. सय्यद सा.आ. :- हया रस्ताचे काम फलटण चौकी पर्यत करावयाचे आहे किंवा कसे.

मा.श्री. मैड स.ब. :- हे काम रामवाडी पर्यतच होणार आहे.

मा.श्री. सय्यद सा.आ. :- फलटण चौकी पर्यत होणे आवश्यक आहे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- आलेले कमीचे दर मंजूर करावे.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- मंजूर.

मा.सभापती साहेब :- आपले सुचने नुसार काम करून घेउ. ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नागरी दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत वॉर्ड क्र.४ व १४ मधील अमर हॉटेल ते रामवाडी चौकापर्यत रस्ता डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा धारक श्री. अनिल झेड कोठारी, अ.नगर यांचे निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत कार्यालयाने सादर केलेला ऑफीस रिपोर्ट पहाता कमीचे निविदा धारक श्री. अनिल झेड कोठारी अहमदनगर यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९%(चार पूर्णाक नव्याण्णव शतांश टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. तिवारी .सु.र.

अनुमोक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-९**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक- ६ गुरूवार दिनांक ४/१०/२००७

ठराव क्रमांक - ६ गुरूवार दिनांक ४/१०/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील अनुसुचित जातीसाठी राखीव असलेल्या प्रभाग क्र.१० मधील बालिकाश्रम कोपरा ते नालेगांव हडको सीना नदी पर्यत बंद गटर करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा धारक श्री.बेस्ट कंन्ट्रक्शन,अहमदनगर यांचे कमीचे दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय-निविदा मंजुरी बाबत.

**कामाचे नांव:-**अ.नगर म.नपा हद्दीतील प्रभाग.क्र१० अनुसुचित जातीसाठी राखीव राखीव प्रभाग बालिका श्रम कोपरा ते नालेगांव हडको ते सीना नदीपर्यत बंद पाईप गटर करणे.

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता :- महासभा ठराव क्र.१ दिनांक २८/२/०७ अन्वये कामास मंजूरी.
२] मा.जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र क्र. सुजयो / वशी/ २३३/०७ दिनांक २६/३/०७ अन्वये दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त.
३] प्रशासकीय मान्यता रक्कम :- रू. १,१८,४३,२६७/-
४] तांत्रिक मान्यता रक्कम :- रू. १,१८,४३,२६७/-
५] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- म.जी.प्रा. (२००६-२००७) सार्व.बां.विभाग (२००७-०८)
६] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम :- रू. १,१८,४३,२६७/-
७] निविदा प्रसिध्दी तारीख :- १/०७/२००७(तृतीय)
८] निविदा विक्री कालावधी :- ३/०७/०७ ते १८/०७/०७ (पंधरा दिवस)
९] निविदा पुर्व बैठक :- २०/०७/२००७
९] निविदा स्विकारण्याची तारीख २३/०७/०७
१०] निविदा उघडण्याची तारीख २४/०७/०७
११] कामाची मुदत :- ६ महिने
११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १. | मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन | २८.९९ % जादा. |
| २. | मे. विनोद मुथ्या | ४१.०० % जादा. |
| ३. | मे.राईट कंन्स्ट्रक्शन | ३१.३१ % जादा. |

वरील तुलणात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन यांचा देकार सर्वात कमी म्हणजे २८.९९ % जादा.आहे. सदर प्रस्ताव छाननी समिती समोर दिनांक ११/०९/२००७ च्या चर्चेला आला. तेव्हा छाननी समितीने देकाराचे वाटाघाटी साठी बोलविले असता देकार कमी करण्यास नकार दिला आहे. अनुषंगाने मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन यांचा सुधारीत देकार २८.९९%जादा दराचाच दि. ११/०९/२००७अन्वये प्राप्त झाला आहे.

सुधारीत देकारानुसार सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १० | सुधारीत देकारानुसार होणारी कामाची किंमत | रू. १,५२,७६,६३०/- |
| ११. | चालु दरसुची सन- ०७-०८ / २००६-०७ म.जि.प्रा. अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. १,२३,५२,६८६/- |
| १२. | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक (१०-११) | रू. २९,२३,९४४/- |
| १३. | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (१२ x १००) / ११ | २३.६७ % जादा |
| १४. | शेरा / अभिप्राय | खालीलप्रमाणे |

सदर कामाची निविदा प्रथम दिनांक ६/४/०७ रोजी प्रसिध्द केली मे. राईट कंन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमी म्हणजे ५४% अधिकची निविदा प्राप्त झाली होती यास्तव सदर निविदा फेटाळण्यात आली.

सदर कामाची द्वितीय निविदा दिनांक ११/५/०७ रोजी प्रसिध्द केली. तेव्हा मे. विनोद मुथ्या यांची सर्वात कमी म्हणजे ४९.०८ % अधिकची निविदा प्राप्त झाली होती सदर निविदा फेटाळण्यात आली.

तृतीय निविदेचा तपशील परिच्छेदामध्ये देण्यात आला ठेकेदाराने त्यांचे दि. ११/९/०७ चे पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे कर, सर्वसाधारण भाववाढ झालेली आहे. तसेच म.जी.प्रा.ची सन २००७-०८ दरसुची अद्याप अप्राप्त असल्याने चालू दरसुचीची किंमत कमी येत आहे.

एकंदरीत निविदा घेणा-यांचा व देकारांचा कल पाहता व तिस-या वेळी निविदा बोलविली असल्याने कामाची निकड लक्षात घेता सदर निविदा स्विकृत व्हावी असे वाटते.

यास्तव अहवाल अवलोकनार्थ तसेच निविदा स्विकृतीसाठी व मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.तिवारी सु.र.:- लॉ.कॉलेजचे पुला पासून की जाधव साहेबांच्या हॉटेल पासून गटरचे काम करणे आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- श्री.जाधव साहेबांचे हॉटेल पासून आहे.

मा.सौ.शेंडगे रो.सं. :- आलेले कमीचे दर मंजूर करावे.

मा.श्री.बोरूडे अ.व :- मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- आलेले कमीचे दर मंजूर करावे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील अनुसुचित जातीसाठी राखीव असलेल्या प्रभाग क्र.१० मधील बालिकाश्रम कोपरा ते नालेगांव हडको सीना नदी पर्यत बंद गटर करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दर धारक श्री. बेस्ट कंन्ट्रक्शन,अहमदनगर यांचे कमीचे दरास मंजुरी मिळणे बाबत कार्यालयाने सादर केलेला ऑफीस रिपोर्ट पहाता कमीचे निविदा दरधारक मे. बेस्ट कंन्स्ट्रक्शन अहमदनगर यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.९९ (अठठावीस पुर्णांक नव्याण्णव शतांश टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ. शेंडगे रो.सं.

अनुमोक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
मा.स्थायी समिती सभा क्रमांक-९
सन २००७-२००८.

विषय क्रमांक- ७ गुरूवार दिनांक ४/१०/२००७

ठराव क्रमांक - ७ गुरूवार दिनांक ४/१०/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे बोट टाईप गेस्ट हाउस या इमारती मध्ये प्रोजेक्टर स्क्रीन युक्त बैठक हॉल, कारपेट, टॉयलेट, सिलींगला फॉल सिलींग करणे, पहिले मजल्या पर्यत जीना बांधणे इत्यादी सुधारणेची कामे करण्यांस व एस्टीमेट रूपये. ९,३५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय-अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बोट टाईप गेस्ट हाउस येथे बैठक हॉलचे नुतनीकरण करणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये रिपोर्ट की, बोट टाईप गेस्ट हाउस येथे महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम चालू आहे. सदर इमारतीच्या मागील बाजूस अस्थित्वातील इमारतीत अद्यावत बैठक हॉल करणेचे काम प्रस्तावीत केले आहे. सदर नुतनीकरणात बैठखॉल, प्रोजेक्टर स्क्रिन ,अतीरिक्त बैठकीकरिता बाल्कनीत व्यवस्था, टॉयलेट ब्लॉक, हॉलमध्ये २५ खुच्यांची व्यवस्था,सर्व सरवाजे खिडक्या बदलणे, सिलींगला फॉल सिलींग करणे, कारपेट करणे, तळमजल्यापासून पहिल्या मजल्यापर्यत जिन्याचे काम करणे,रंगकाम करणे व किरकोळ फेरबदल करण्याचे प्रस्तावीत केले आहे.

सदर कामाचे मे. कंकरिया & असो. यांनी कामाचे डिझाईन व अंदाजपत्रक तयार केले आहे. सदर कामाकरिता रक्कम रूपये ९,३५,०००/- अंदाजपत्रक तयार केले आहे. तरी सदर कामास व खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेस रिपोर्ट आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे प्र.उपशहर अभियंता यांचा अहवाल असे.

| | |
|---|---|
| लेखाशिर्षक :- | नवीन इमारती |
| तरतूद :- | ८०,००,०००/- |
| मागील खर्च :- | ७,१७,८९९/- |
| चालू खर्च :- | ९,३५,०००/- |
| एकूण शिल्लक :- | ६३,४७,१०१/- |

| | |
|---|---|
| कामाची अंदाजीत किंमत :- | ७,८५,०००/- |
| इलेक्ट्रीकल वर्क :- | ७५०००/- |
| आर्किटेक्ट फी | ७५०००/- |
| आकस्मीत खर्च इ.:- | |
| | ९,३५,०००/- |

शहर अभियंता :-उपरोकत अंदाजाप्रमाणे प्रशासकीय मंजूरी मिळावी यासाठी सादर अंदाजपत्रकातील बरेचशे आयटम दरसुची बोहरील असल्याने सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे प्रगतीत आहे. ठोबळ अंदाजास प्रशासकीय मंजूरी देणेस हरकत नाही. ता.मा. देताना सविस्तर अंदाजपत्रक तयार करूनच पुढील कार्यवाही केली जाईल.

अं.लेखा परिक्षक :- सादर, अंदाजपत्रकीय मंजूरीस अधिन राहून मान्यतेस्तव

मा.उपायुक्त साहेब :- 'अ' प्रस्तावीत मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- स्थायी समितीची मान्यता घ्यावी. दि.४/१०/०७

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे बोट टाईप गेस्ट हाउस या इमारती मध्ये प्रोजेक्टर स्क्रीन युक्त बैठक हॉल, कारपेट, टॉयलेट, सिलींगला फॉल सिलींग करणे, पहिले मजल्या पर्यत जीना बांधणे इत्यादी सुधारणेची कामे करण्यांस व एस्टीमेट रूपये. ९,३५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

या विषयावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-आपले म.न.पा.चे बोट टाईप गेस्ट हाउस येथील इमारती मध्येसभे करिता अत्याधुनिक बैठक हॉल व इतर कामे करणेस व खर्चास तातडीने प्रशासकीय मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव आलेला आहे.

मा.श्री. घुले अ.ह. :- प्रशासकीय मंजूरी द्यावी.

मा.श्री.तिवारी सु.र. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे बोट टाईप गेस्ट हाउस या इमारती मध्ये प्रोजेक्टर स्क्रीन युक्त बैठक हॉल, कारपेट, टॉयलेट, सिलींगला फॉल सिलींग करणे, पहिले मजल्या पर्यत जीना बांधणे इत्यादी सुधारणेची कामे करण्यांस व एस्टीमेट रूपये ९,३५,०००/- (रू. नउ लाख पस्तीस हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. घुले अ.ह.

अनुमोक :- मा.श्री. तिवारी सु.र.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका